खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – ०३/०२/२०१८

प्रेसनोट

**मध्यवस्तीतील प्रसिध्द लक्ष्मीनारायण चिवडा दुकान फोडणारा जेरबंद चोवीस तासामध्ये गुन्हा उघड रोख रक्कम, सोने व चांदीचे दागिण्यासह सहा लाख सव्वीस हजाराचा ऐवज हस्तगत**

महाराष्ट्र व पुणे शहरातील सुप्रसिध्द लक्ष्मीनारायण बेस्ट चिवडा घ नं ३७४, भवानी पेठ, पुणे हे दुकान व कारखाना बंद असताना दिनांक ३१/०१/२०१८ रोजी रात्री ०८/३० वा. ते दिनांक -०१/०२/२०१८ रोजी सकाळी ०८/३० वा. चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने दुकानाच्या मागील बाजुने गेट वरुन प्रवेश करुन बनावट चावीच्या सहाय्याने दुकानाचे व ऑफिसचे कुलुप उघडुन आत प्रवेश करुन लोखंडी तिजोरीतील सोन्याचे दागिने, चांदीची नाणी, रोख रक्कम व दुकानातील तीन मॉनीटर व एक डी.व्ही.आर. असा एकुण सव्वा सहा लाखाचा ऐवज घरफोडी चोरी करुन नेला होता त्याबाबत दुकानाचे मालक प्रशांत बाबुलाल डाटा वय - ४२ वर्षे, धंदा व्यवसाय रा - ५८४/१ सॅलसबरी पार्क पुना ॲडव्हेंटिस्ट हॉस्पिटलजवळ पुणे यांनी पोलीसांकडे तक्रार दिली आहे.

भर मध्यवस्तीमध्ये वर्दळीच्या ठिकाणी अशाप्रकारे चोरी झाल्याने त्याभागात प्रचंड खळबळ उडाली होती. घटनेबाबत पोलीसांना माहीती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळी येवुन पाहणी केली व गुन्हयाचा तपास सुरु केला घटनास्थळावरील एकंदरीत परिस्थितीवरुन सदर गुन्हा दुकान व कारखाण्याची पुर्ण माहीती असलेल्या कोणीतरी इसमाने केल्याचा संशय बळावल्याने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी त्या अनुषंगाने तपास करण्याबाबत सुचना दिल्या होत्या त्यानुसार पोलीसांनी सर्व कामगारांकडे बारकाईने कसुन तपास केला असता दुकानात यापुर्वी कामास असलेला रतन पटेल हा कामगार तीन दिवसापासुन कामावर आला नसल्याची माहीती मिळाली त्यावरुन त्यानेच गुन्हा केल्याचा संशय पोलीसांना आला त्याचा शोध घेत असताना पोना अनिकेत बाबर यांना माहीती मिळाली की रतन पटेल हा त्याचे गावी विष्णुपुरा जिल्हा कृषीनगर उत्तरप्रदेश येथे पळुन जाणार आहे. अशी माहीती मिळाल्याने पोलीसांना पुणे स्टेशन परिसरात सापळा लावुन संशयीत इसम **रतन नंदलाल पटेल वय - २२ रा – ९३१ किंग्ज बेकरी भवानी पेठ पुणे मुळ गाव – चाफ विष्णुपुरा ता – तमकुहीराज जिल्हा – कृषी नगर उत्तर प्रदेश हा पळुन जाण्याचे तयारीत असताना त्यास दिनांक – ०२/०२/२०१८ रोजी ताब्यात घेतले आहे. त्यावेळी त्याचे ताब्यातुन गुन्हयातील चोरलेली रोख तीन लाख चौ-यान्नव हजार रुपये, पासष्ट ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व एक किलो वजनाची एकुण एकोणपन्नास चांदीची नाणी चोरलेले तीन मॉनिटर व एक डीव्हीआर असा सर्व मिळुन एकुण सहा लाख तेहतीस हजाराचा माल जप्त करण्यात आलेला आहे व चोवीस तासाच्या आत पोलीसांनी सदर गुन्हा उघडकीस आणलेला आहे.**

मा. वाय. एस. पैठणकर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सहावे न्यायालय पुणे यांचे न्यायालयात आरोपीस हजर करण्यात आले होत. आरोपीकडुन गुन्हयातील आणखी माल जप्त करण्यासाठी तसेच अशाप्रकारे आणखी गुन्हे केले आहेत का ? त्याचे इतर कोणी साथीदार आहे का ? याबाबत तपास करणेकामी सरकारी वकील श्री ज्ञानेश्वर मोरे यांनी त्याची पोलीस कस्टडी मिळणेबाबत मागणी केली होती त्यास दिनांक – ०६/०२/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. बसवराज तेली, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. किशोर नाईक यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के, तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड, अनंता व्यवहारे व तपास पथकातील कर्मचारी विजु कांबळे, विश्वनाथ शिंदे, विनोद जाधव, गणेश माळी, इम्रान नदाफ, अनिकेत बाबर, अशिष चव्हाण, राकेश क्षीरसागर, रवि लोखंडे, महेश कांबळे, संदिप कांबळे, सागर केकाण, विशाल शिंदे यांनी केलेली आहे.